**इमहाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. २५/२०१८-१९/185 दिनांक: ०६.०८.२०१८

## आदेश

### आदेश केस क्र. २५(२०१८-२०१९)

श्री श्रीकांत राऊ पाटील
मु.पो. कणेरी ता. करवीर जि. कोल्हापूर — **अर्जदार**

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, कोल्हापूर

२) कार्यकारी अभियंता
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
ग्रामिण विभाग-२

३) उपकार्यकारी अभियंता
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उप विभाग कागल — **पक्षकार**

**कोरम:-**१.श्री ए.व्ही. देशपांडे, अध्यक्ष
२.श्री. पी.व्ही.. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. पुजारी, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

### न्यायनिर्णय

मी ए.व्ही. देशपांडे अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

तक्रारदार श्री श्रीकांत राऊ पाटील, मु.पो. कणेरी ता. करवीर जि. कोल्हापूर यांनी सदर गा-हाणे अपिल, त्यांना शेती पंप वीज जोडणी त्वरीत मिळणेसाठी दिनांक २१.०६.२०१८ रोजी दाखल केले आहे.

## गा-हाण्याचे संक्षिप्त स्वरुप.

तक्रारदार यांचे म्हणणे असे की, त्यांनी शेतीसाठी नविन वीज जोडणी मिळणेसाठी रितसर अर्ज दिनांक ३१.०८.२०१३ रोजी केला. त्यास मंजूरी देण्यास वि.प. विज वितरण कंपनीने २ वर्षे विलंब लावला.त्यानंतर वि.प. कंपनीने कोटेशन दिनांक २७.०८.२०१५ दिलेनंतर दिनांक १४.०९.२०१५ रोजी पावती दिनांक ७१८४४९१ अन्वये रु. ३,८९६/- वि.प. यांचेकडे सादर करुन नंतर आवश्यक ती रक्कम भरणा केली. परंतु त्यांना वीज जोडणी मिळाली नाही म्हणून त्यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर यांचेकडे तक्रार दाखल केली. सदर कक्षाने दिनांक १७.०५.२०१८ च्या आदेशाने ग्राहकाची त्वरीत विज जोडणीची मागणी फेटाळण्यात येत आहे. असा निर्णय दिला. त्याने समाधान झाले न झाल्यामुळे या मंचाकडे प्रस्तुत अपिल दाखल केले आहे. ग्राहकांने तात्काळ विद्युत पुरवठा मिळावा अशी विनंती केली व कृती मानकेनुसार परिशिष्ट 'अ' मध्ये नमूद अकसलेल्या नुकसान भरपाई मिळावी ही विनंती केली आहे.

## वि. प. यांची भूमिका.

श्री श्रीकांत राऊ पाटील मु.पो. कणेरी जि. कोल्हापूर यांनी शेती पंप विद्युत कनेक्शनसाठी दिनांक २०.०८.२०१५ रोजी अर्ज केला होता. तरी सदर कनेक्शनसाठी (ग्राहक क्र. २६७४२००४९७३७) उपविभाग कागल तर्फे त्यांना दिनांक २७.०८.२०१५ रोजी कोटेशन देण्यात आले होते. सदर कोटेशन श्री श्रीकांत राऊ पाटील यांना दिनांक १४.०९.२०१५ रोजी (पावती क्र. ७१४४९१) या प्रमाणे भरले आहे. सदर अंदाजपत्रक क्र. EE/RII/LGL/Infra/२०/२०१५-१६ नुसार उच्च दाब वाहिनी ०.१४ कि.मी.. लघु दाब वाहिनी ०.७२ कि.मी. व रोहित्र ६३ के.व्ही. ए. मंजूर आहे.

उपविभाग कागल अंतर्गत शेती पंप विद्युत कनेक्शनची जेष्ठता यादी प्रमाणे माहे मार्च-२०१५ पर्यन्त कोटेशन भरलेल्या ग्राहकांची अंदाजपत्रकाप्रमाणे पायाभूत आराखडाची उभारणी करुन कनेक्शन देण्यात आली आहे. तसेच माहे मार्च-२०१५ नंतरच्या सर्व ग्राहकाची यादी उच्च दाब (एच.व्ही.डी.एस.) वितरण योजने तंर्गत समाविष्ट करणेत आली आहेत. सदर उच्च दाब वितरण योजने अंतर्गत श्री श्रीकांत राऊ पाटील यांचे शेती पंप विद्युत कनेक्शन देणेकरिता उच्च दाब वाहिनी ३.७२ कि.मी. रोहित्र १० एम.व्ही.ए. प्रस्तावित करणेत आलेला आहे. तरी श्री श्रीकांत राऊ पाटील यांचे शेती पंप विद्युत कनेक्शन जेष्ठता यादी प्रमाणे उच्च दाब वितरण योजनेंतर्गत पायाभूत आराखडयाची उभारणी झालेनंतर लवकर देण्यात येईल.

उपविभाग कागल अतर्गत असणारी शेतीसाठी वीज पुरवठा देणे आवश्यक असणारी विद्युत संच उभारणीची कामे ही प्रतिक्षा यादी मधील सन-२०१५ च्या यादीमध्ये सदर ग्राहकाचे नाव २४ व्या क्रमांकास आहे.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०६.०८.२०१८ रोजी मंचासमोर घेणेत आली. त्यावेळी तक्रारदार स्वतः हजर होते. वि.प. तर्फे उपकार्यकारी अभियंता उपविभाग कागल श्री. श्री गणेश पोवार, हे हजर होते. त्यांचे तोंडी युक्तिवाद ऐकणेत आले. उपलब्ध कागदपत्रे वाचणेत आली आहेत.

या मंचाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होत आहेत.

१) तक्रारदार यांना त्यांच्या मागणीनुसार शेतीसाठी नवीन वीज जोडणी निश्चित कालावधीत देण्याचा आदेश करणे योग्य होईल काय?तसेच मागणी केलेली नुकसान भरपाई देणे योग्य होईल काय?

उत्तरः- होय.

२) कोणता अंतिम आदेश?

उत्तरः- शेवटी नमूद केल्याप्रमाणे.

**कारणमिमांसा**

नविन वीज जोडणी लवकरात लवकर मिळावी व विलंब भरपाई देण्यात यावी अशी विनंती तक्रारदार यांनी मंचासमोर केली आहे. त्यांनी वि.प.कडे रक्कम भरल्यानंतर त्यांना नियमानुसार तीन महिन्यात वीज जोडणी मिळालेली नाही.ही बाब वि.प. कंपनीने मान्य केलेली आहे. विलंबाबाबत दिलेल्या कारणाचा हया कामी विचार करता येत नाही कारण ती कारणे, २०१४ च्या विनियम कलम ११.१ च्या बाहेरची आहेत. तक्रारदार यांना वीज पुरवठा करण्यासाठी वर नमूद केल्याप्रमाणे लघुदाब वाहिनीचा विस्तार करावा लागणार आहेत. तक्रारदार यांची नावे प्रतिक्षायादीत विशिष्ट क्रमांकास नोंद आहेत. याबाबत फारसा विचार करता येणार नाही.

कृतीमानके विनियमाप्रमाणे वीज जोडणी देण्यात विलंब झाल्यास भरपाई देण्याची तरतूदही विद्युत नियामक आयोगाने केली आहे. त्यामुळे "प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य" तत्वाचा उपयोग वि.प. यांना करता येत नाही.

या केसमध्ये तक्रारदार यांनी त्वरीत विज पुरवठा न मिळाल्याने कृती मानकानुसार नुकसान भरपाईची मागणी केलेली तशी ती देण्यात यावी अशी मागणी स्वतः ग्राहकाने केलेली आहे ती योग्य आहे. असा या मंचाचा निष्कर्ष आहे.

**आदेश**

१) तक्रारदार यांना त्यांच्या मागणी प्रमाणे शेतीसाठी नविन वीज जोडणी वि.प. यांनी या आदेशाच्या तारखेपासून ४५ दिवसाच्या आंत वीज पुरवठा चालू करावा असा वि.प. यांना आदेश देणेत येत आहे.

6/8/2018

GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST.

२) तसेच विरुध्द पक्षकाराने दिनांक ३१.०८.२०१३ पासून हया आदेशाचे तारखेपर्यन्त कृती मानके परिशिष्ट "अ" विद्युत पुरवठा( तात्पुरत्या पुरवठयासह) सुरु करणे मधील अ.क्र. ३ नुसार विलंबाच्या प्रत्येक आठवडयाकरता रु.१००/- प्रमाणे एकूण रक्कम रु.२४,५००/- फक्त भरपाई घ्यावी.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

6/8/2018 — ( पी.एस. पुजारी) ग्राहक सदस्य

6/8/2018 — (पी. व्ही. खपली) सदस्य सचिव

6/8/2018 — (ए.व्ही. देशपांडे) अध्यक्ष

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण